महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर
डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022
दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल - mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती/नागपूर/आस्था/141 /2023-24 दिनांक -16/01/2024

# भारतीय वन सेवा (UPSC) मुख्य परीक्षा-2023 उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अर्थ सहाय्य योजनेचे तपशील

महाराष्ट्र राज्यातील इतर मागासवर्ग विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील भारतीय वन सेवा मुख्य परीक्षा-2023 उत्तीर्ण (दि.12/01/2024 रोजी UPSC ने जाहीर केलेल्या निकालाप्रमाणे) उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परीक्षेसाठी एकरकमी अर्थ सहाय्य प्रदान करण्यासाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**योजनेचे स्वरुप** :- भारतीय वन सेवा (UPSC) मुख्य परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेल्या व व्यक्तिमत्त्व चाचणी/मुलाखत परिक्षेसाठी पात्र नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना एकरकमी रक्कम रु.25,000/- आर्थिक सहाय्य महाज्योती मार्फत देण्यात येईल.

**योजनेच्या लाभासाठी पात्रता** :-

1. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी असावा.
2. विद्यार्थी नॉन क्रिमीलेअर गटातील इतर मागासवर्गीय, विमुक्त जाती - भटक्या जमाती ती तसेच विशेष मागास प्रवर्गापैकी असावा.
3. विद्यार्थी हा भारतीय वन सेवा मुख्य परीक्षा-2023 (दि.12/01/2024 रोजीच्या निकालानुसार) उत्तीर्ण झालेला असावा.
4. ज्या उमेदवारांना सदर परीक्षेसाठी इतर संस्था/सारथी, पुणे यांचेकडून अर्थसहाय्य मिळत असल्यास अश्या उमेदवारांना सदर योजनेच्या लाभासाठी ग्राह्य धरल्या जाणार नाही.

**अर्ज करण्यासाठी आवश्यक वैयक्तिक कागदपत्रे** :-

1. आधार कार्ड
2. जातीचा प्रमाणपत्र
3. वैध नॉन-क्रिमिलेअर प्रमाणपत्र
4. मुख्य परीक्षेचे प्रवेश पत्र
5. बॅंकेचे तपशील (बॅंक पासबुक किंवा रद्द चेक)

6. भारतीय वन सेवा मुख्य परीक्षा-2023 उत्तीर्ण झालेल्या निकालाची प्रत (बैठक क्रमांक ठळक करून देण्यात यावा.)

**अर्ज कसा करावा**:-

1. महाज्योती www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावर जाऊन Notice Board मधील **Application Invited For Financial Assistance Those Who Qualified For Indian Forest Services- 2023 Personality/Interview Test Sponsorship** यावर जाऊन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा.

2. अर्जासोबत वरील नमूद कागदपत्रे स्वाक्षांकीत करुन स्पष्ट दिसतील असे स्कॅन करुन अपलोड करावे.

**अटी व शर्ती** :

1. अर्ज करण्याचा अंतिम दि.30/01/2024 आहे.
2. पोस्टाने किंवा ई-मेल व्दारे प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.
3. जाहिरात रद्द करणे, मुदतवाढ देणे, अर्ज नाकारणे व स्विकारणे याबाबतचे सर्व अधिकार हे व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती यांचे राहतील.
4. चालू आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा अर्थसहाय्याचा लाभ घेतलेला विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
5. महाज्योती मार्फत MPSC, UPSC, MPSC Group B & C, MBA-CAT/CMAT-CET, UGC-NET-SET, मिलीटरी भरती परीक्षा पुर्व प्रशिक्षण यापैकी चालु योजनेचा लाभ घेत असलेले विद्यार्थी या योजनेकरीता पात्र राहणार नाही.
6. बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावाचेच असावे, नातेवाईक/पालक/मित्र यापैकी आढळल्यास विद्यार्थ्यांचे अर्ज महाज्योती, नागपूर मार्फत रद्द करण्यात येईल.
7. अर्ज भरतांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास केवळ महाज्योतीच्या Call Centre वर पुढील क्रमांकावर संपर्क करावा : **0712-2870120/21**.
   **E-mail Id** : mahajyotimpsc21@gmail.com

(स्वा.)
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक,
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था,
(महाज्योती) महाराष्ट्र राज्य, नागपूर.